Office of The Divisional Forest Officer,
Mumbai Mangrove Conservation Unit
B/68, 1St Floor,
Kamgar Nagar, Kurla (East)
Kurla (E)-400 024
Email:-dfommcu@mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग

विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक, यांचे कार्यालय
रुम नं. बी/68, पहिला मजला,
कामगार नगर, कुर्ला (पूर्व)
कुर्ला (पूर्व)- 400 024
फोन क्र. 022-25220097

**आदेश**

विषय : एकरेषिय ( Linear) प्रकल्पांबाबत झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी (Working Permission) देण्याबाबत मुंबई मेट्रो लाईन २- बी करीता वाकोला नाला लगत मेट्रो पियर (piers) बांधण्याकरीता ०.२० हेक्टर कांदळवन क्षेत्राबाबत.

जा.क्र. कक्ष-९/जमिन/**प्र.क्र.१५७/३४**/ 1582 /२०२०-२१
कुर्ला- ४०० ०२४, मुंबई दि. 15 /०१/२०२१.

संदर्भ –१. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे वनवृत्त यांच्याकडील पत्र क्र. कक्ष-१०/वसं/प्र.क्र.२३/ २०-२१/ जा.क्र. ३०५/दिनांक.१५/१२/२०२०.
२. केंद्र शासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय, नागपूर कडील पत्र क्र.एफसी- I/एमएच-१३४/२०१८ - एनजीपी/४७६१,दिनांक. ०७.०१.२०२१.
३. केंद्र शासन पत्र क्र. एफ नं- ११-३०६/२०१४/एफसी,दिनांक.१५.०१.२०१५.
४. पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफ.नं. ११/३०६/२०१४, दिनांक. ०७.०५.२०१५
५. शासन परिपत्रक क्र.एफएलडी-२०१५/प्र.क्र.७७/फ-१०, दिनांक.०१.०७.२०१५.
६. मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय) मुंबई यांचेकडील पत्र क्र. एफएलडी- १११६/प्र.क्र.२७०/ फ-१०, दिनांक. २०.०७.२०१७.

उपरोक्त संदर्भान्वये वनक्षेत्रपाल मध्य मुंबई, मुंबई कांदळवन संधारण घटक यांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. ०१ अन्वये विषयांकित वनेत्तर कामाच्या अनुषंगाने यंत्रणेला Working Permission देण्यात आलेली आहे. वनक्षेत्रपाल यांना सुचित करण्यात येते की, विषयांकित प्रकल्प हा एकरेषीय प्रकल्प आहे. शासन परिपत्रक दिनांक- ०१/०७/२०१५ त्यानुसार संबंधित प्रकल्प यंत्रणेने आवश्यक अटींची पूर्तता केलेली आहे.

वनक्षेत्रपाल मध्य मुंबई, मुंबई कांदळवन संधारण घटक यांनी वळतीकरणाचे वनक्षेत्र जागेवर सिमांकन करुन सदर क्षेत्रातील मंजूर आदेशानूसार आवश्यक कमीत कमी वृक्षतोड करावी. तसेच, वृक्षतोडीनंतर निर्माण होणाऱ्या मालाची वाहतुक डेपोपर्यंत करावी. सदरचे वनक्षेत्र प्रकल्प यंत्रणेला प्रस्तावित काम करण्याकरिता वळतीकरण करुन द्यावे.

संबधित प्रकल्प यंत्रणेला काम सुरु करण्यापूर्वी यंत्रणेने संदर्भ क्र. १ मध्ये दिलेल्या पत्रानुसार संदर्भीय सर्व आदेश सर्वे क्र., क्षेत्र, आणि वैधानिक दर्जा आणि केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या आदेशातील अटी व शर्ती यांच्या सह एका स्थानिक भाषेतील व एका इंग्रजी भाषेतील अशा दोन दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द केले किंवा कसे? याची शहानिशा करून त्यानंतरच पुढील प्रकरणी कार्यवाही करावी.

-२-

तसेच संबधित प्रकल्प यंत्रणेकडून संदर्भ क्र. ०१ पत्रातील अटी व शर्ती, केंद्रशासनाच्या मंजूर आदेशातील अटी व शर्ती, वनसंवर्धन कायदा १९८०, उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्र. ८७/२००६ मधील दिनांक. १७/०९/२०१८ रोजीचे आदेश यांचा भंग होणार नाही. याची दक्षता घ्यावी. तरी प्रस्तावित कामे वनक्षेत्रपाल मध्य मुंबई, मुंबई कांदळवन संधारण घटक यांनी त्यांचे निरीक्षणाखाली करण्यात यावी.

तसेच वरिलप्रमाणे कार्यवाही करुन अहवाल सादर करावा.

15/1/2021

विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक

प्रति,

वनक्षेत्रपाल मध्य मुंबई मुंबई कांदळवन संधारण घटक.

प्रतिलिपी- ०१. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष,मुंबई यांना माहितीसाठी सादर.

०२. सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

०३. वरिष्ठ नियोजक , मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा मुंबई यांना माहितीसाठी व संदर्भ क्र.१ मधील मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाहीसाठी रवाना.